मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपाकडून आचारसंहितेचे उल्लंघन

## गल्लोगल्ली भाजपाचे 'कमळ' : दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

गल्लोगल्ली कमळ चिन्ह लावून निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेचे उल्लंघन करूनही संबंधितांवर कारवाई करण्यात अधिकारी,कर्मचारी कसूर करत आहेत.भाजपा पदाधिकाऱ्यांच्या चुकांना खतपाणी घालणाऱ्या दोषी अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केली. तसेच कमळ चिन्ह लावणाऱ्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करावे, अशी मागणी काळे यांनी पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

सतीश काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे पालन करणे सर्वांना अनिवार्य आहे. मात्र त्याचे भान भाजपच्या पदाधिकाऱ्यांना नाही. पिंपरी चिंचवड शहरात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपल्या पक्षाचे चिन्ह आणि नावाचा खुलेआम वापर करताना दिसत आहेत. वास्तविक पाहता संबंधित निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी पक्षांचे चिन्ह, लोगो हटविण्याची कार्यवाही पार पाडणे आवश्यक आहे. मात्र निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आहेत की काय असा प्रश्न पिंपरी चिंचवड शहरातील सामान्य जनतेला पडत आहे. भाजपाचे चिन्ह असलेले कमळ शहराच्या गल्लोगल्ली उघडपणे दिसत आहे. सार्वजनिक भिंती, पोस्टरवर हे चिन्ह दिसत आहे. त्याच्यावर अद्याप कारवाई होताना दिसत नाही.




या बाबत कमळ चिन्हाचे फोटोसह निवेदन देऊन संभाजी ब्रिगेडच्या वतीने इशारा देण्यात आला होता. त्यांनतर काही काळ कारवाईचा दिखावा करण्यात आला. मात्र शहरातील संपूर्ण भाजपचे चिन्ह हटविण्याकडे अधिकारी कानाडोळा करत आहेत. पुन्हा शहरात भाजपाने राजरोसपणे आपल्या चिन्हाचा वापर सुरु केला आहे. निवडणूक आयोग देखील याची गांभीर्याने दखल घेत नाहीत. आचारसंहितेच्या नियमांना फाट्यावर मारणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणाकडे गंभीरपणे न बघणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर देखील कारवाई करावी, अशी मागणी काळे यांनी केली.

### आदर्श आचारसंहितेचं उल्लंघन झाल्यास काय?

सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा आदर्श आचारसंहितेची वैधता कायम ठेवली आहे. निवडणूक आयोगाला आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास चौकशी करून शिक्षा ठोठावण्याचा पूर्ण अधिकार आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला निवडणूक प्रचारासाठी सरकारी वाहन, विमान किंवा बंगला वापरता येणार नाही. कोणताही उमेदवार सरकारी यंत्रणा किंवा मतदारांना पैशाचे आमिष दाखवू शकत नाही. राजकीय पक्ष, उमेदवार, नेते किंवा समर्थक यांना रॅली काढण्यापूर्वी पोलिसांची परवानगी घ्यावी लागेल. जनतेचा पैसा कोणत्याही पक्षाच्या किंवा नेत्याच्या फायद्यासाठी वापरता येणार नाही.

# भाजपच्या आजी-माजी शहराध्यक्षांच्या बारणेंना ‘हॅट्रिक’साठी शुभेच्छा!

## निमित्त वाढदिवसाचे, खलबते लोकसभा निवडणुकीची!

पिंपरी | प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे पिंपरी- चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भाजपचे आमदार महेश लांडगे व मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांची भेट झाली. भाजपच्या आजी-माजी शहराध्यक्षांनी यावेळी खासदार बारणे यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये ‘हॅटट्रिक’साठी शुभेच्छा दिल्या.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप -राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी पिंपळे गुरव येथील त्यांच्या बंगल्यावर पोहोचले. त्याचवेळी भाजपचे माजी शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे हे देखील त्या ठिकाणी आले.

श्रीरंग बारणे व महेश लांडगे यांनी शंकर जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. निवडणुकांचा काळ असल्यामुळे त्यानंतर काही वेळ राजकीय व्यूहरचनेबाबत देखील या नेत्यांमध्ये चर्चा झाली.

भाजपा शिवसेनेबरोबर आता राष्ट्रवादी काँग्रेस देखील सहभागी झाल्याने महायुतीची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गेल्या दहा वर्षात केलेल्या विकासकामांमुळे या निवडणुकीतही देशात ‘मोदी लाट’ आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी हे पंतप्रधान पदाची तर बारणे हे खासदारकीची ‘हॅटट्रिक’ करतील, या शब्दांत जगताप व लांडगे यांनी बारणे यांना शुभेच्छा दिल्या.



येत्या दोन दिवसात महायुती मधील सर्व मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक समन्वय बैठक होणार असून त्यात निवडणूक प्रचाराचे नियोजन करण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले.

# अब की बार भाजपा हद्दपार : अमोल कोल्हे

## भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील शेतकरी मेटाकुटीला आला

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांचा आज हवेली तालुक्यातील दौरा अष्टविनायक पैकी एक असलेल्या श्री क्षेत्र थेऊर येथील “बाप्पा चिंतामणीच्या” चरणाशी लीन होऊन सुरुवात झाला. यावेळी श्री क्षेत्र थेऊरच्या ग्रामस्थांनी जंगी स्वागत करत वाजत गाजत मिरवणूक काढली. दरम्यान डॉ. कोल्हे यांच्या हस्ते बाप्पा चिंतामणीची आरती करण्यात आली. थेऊर येथून सुरू झालेला गाव भेट दौरा सायंकाळी उशिरा उरुळी कांचन परिसरात समारोप करण्यात आला.

अब की बार भाजपा हद्दपार केल्याशिवाय शेतकऱ्यांना सुखाचे दिवस येणार नाही. या शेतकरी विरोधी सरकारला सत्तेवरून खाली खेचण्याची जबाबदारी आता आपल्या मायबाप जनतेत आहे. भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील शेतकरी मेटाकुटीला आला आहे. शेतकऱ्यांना जर चांगले दिवस हवे असतील तर या भाजप सरकारला हद्दपार करणे गरजेचे आहे. भाजपच्या मांडीला मांडी लावून बसलेल्या इतर पक्षांना मतदान करण्यापूर्वी या देशातील शेतकरी नक्कीच विचार करेल, असं शिरुर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान शिरुर लोकसभा मतदारसंघातील या शेतकऱ्याच्या पोराला घेरण्यासाठी राज्यातील मोठे मोठे नेते मतदारसंघात येतात परंतु माझा मायबाप जनतेवर विश्वास असल्याच्या भावना यावेळी बोलताना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केल्या. दरम्यान माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, विरोधकांकडे इतर मुद्दे नसल्याने खोटं बोल पण रेटून बोल अशा पद्धतीचा प्रकार सुरू आहे. स्वतः ज्यांना तीन टर्म या जनतेने आशिर्वाद दिले, निधी खर्च हा ज्या मंजुऱ्या आणि प्र.मा. असतात त्या मोजल्या जात नाही. कोरोना काळात खासदार निधी मिळत नव्हता, त्यावेळेच्या बातम्या काढून शिळ्या कढीला ऊत आणण्याचा हा प्रकार आहे. संपूर्ण खासदार निधी खर्च करून वर तीन कोटींचा प्रस्ताव आहे. मी विरोधी खासदार असूनही खासदार निधी केवळ पाच कोटी असताना तरीही साडे एकोणीस हजार कोटी रुपये निधी मतदारसंघात आणू शकल्यामुळे हे सांगताना विरोधकांची अडचण होते म्हणून खोटं बोल पण रेटून बोल असा प्रकार सुरू आहे.

राज्यात शिवसेनेसह राष्ट्रवादी पक्षात देखील मोठी फुट पडली असून याचा फटका उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. २०१९ साली अमोल कोल्हे यांनी जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर येथे आघाडी घेतली होती. तर भोसरी आणि हडपसर येथे आढळराव पाटलांना मोठ्या प्रमाणात लीड मिळालं होतं. आता शिरूर लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी पाच आमदार महायुतीत सहभागी आहेत. अशातच जुन्नरमध्ये अतुल बेनके, आंबेगावमधून दिलीप वळसे पाटील तर खेड-आळंदीमधून दिलीप मोहिते पाटील हे अजित पवार गटात आहेत.



### शिवसेना, राष्ट्रवादीतील फुट कोल्हेंच्या पथ्यावर ?

राज्यात शिवसेनेसह राष्ट्रवादी पक्षात देखील मोठी फुट पडली असून याचा फटका उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. २०१९ साली अमोल कोल्हे यांनी जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर येथे आघाडी घेतली होती. तर भोसरी आणि हडपसर येथे आढळराव पाटलांना मोठ्या प्रमाणात लीड मिळालं होतं. आता शिरूर लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी पाच आमदार महायुतीत सहभागी आहेत. अशातच जुन्नरमध्ये अतुल बेनके, आंबेगावमधून दिलीप वळसे पाटील तर खेड-आळंदीमधून दिलीप मोहिते पाटील हे अजित पवार गटात आहेत. त्यामुळे याठिकाणी आढळराव पाटलांना ताकद मिळण्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला हडपसर आणि भोसरी विधानसभेत मागच्यावेळी आढळरावांना चांगलं मताधिक्य मिळालं होतं. यावेळीही भोसरीचे आमदार महेश लांगडे तर हडपसरचे आमदार चेतन तुपे हे महायुतीत आहेत. त्यामुळे याठिकाणांहूनही आढळराव पाटलांना लीड मिळणार असल्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीसोबत असलेले एकमेव आमदार अशोक पवार यांनी कोल्हेंना पाठिंबा जाहीर केला आहे. याठिकाणी आढळराव पाटलांची ताकद अधिक दिसून येत आहे.

# शैक्षणिक निर्णयामुळे निवडणुकीत फटका?

## शिक्षण संस्थेने शिक्षण मंत्र्यांना पाठविलेल्या पत्राची चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाही प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रधान यांना पत्र पाठवले आहे.

व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन पदवी (बीसीए) अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) कोणतीही चर्चा न करता घेतला. यंदा निवडणूक वर्ष असल्याने या काळात विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य घटकांच्या नाराजीचा मोठा फटका बसू शकतो, अशा सूचक शब्दांत इशारा देऊन निर्णय किमान एक वर्ष स्थगित करण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाही प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी या संदर्भातील पत्र प्रधान यांना पाठवले आहे. एआयसीटीईने घेतलेल्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या समस्या पत्राद्वारे प्रधान यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. तसेच शिक्षण संस्थांना होणाऱ्या त्रास, अडचणी याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.एआयसीटीईने घेतलेल्या निर्णयामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. अभ्यासक्रमांच्या मान्यतेची प्रक्रिया दमवणारी, अनेक प्रकारची माहिती मागणारी आहे. त्यामुळे त्याची पूर्तता करताना महाविद्यालये, शिक्षण संस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्याशिवाय या निर्णयाचा ग्रामीण, आदिवासी, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. निवडणुकीत या नाराजीचा मोठा फटका बसू शकतो, असा सूचक इशारा या पत्रातून देण्यात आला आहे.



### महाविद्यालयांना मान्यता घेणे बंधनकारक...

**» 'बीबीए', 'बीएमएस', 'बीसीए' 'एआयसीटीई'ने हे तिन्ही अभ्यासक्रम आपल्या कार्यक्षेत्रात घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'एआयसीटीई'मार्फत राबविल्या जाणाऱ्या 'एमबीए' आणि 'एमसीए' या अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयांना 'एआयसीटीई'ची मान्यता घ्यावी लागते. 'एआयसीटीई'ने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या तंत्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेशांची माहिती पुस्तिका काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केली. त्यात 'बीबीए', 'बीएमएस', 'बीसीए' अभ्यासक्रमांसाठी मान्यता घेणे बंधनकारक केल्याचा उल्लेख करण्यात आला असून, 'एआयसीटीई'च्या वेबसाइटवरही ही माहिती जाहीर करण्यात आली आहे**

# महसूल संकलनाची विक्रमी 112 टक्के उद्दिष्टपूर्ती

## मार्चअखेर 28 लाख दस्तांची नोंदणी पूर्ण : 50 हजार 500 कोटींची विक्रमी वसुली

**पिंपरी | प्रतिनिधी**

महसूल संकलनाच्या उद्दिष्टपुर्तीसाठी विविध उपाययोजना व आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून नियोजनबद्ध प्रयत्नाद्वारे सन २०२३-२०२४ साठी ४५,००० कोटी रुपयांचे महसूल संकलनाचे उद्दिष्ट असताना उद्दिष्टाच्या ११२ टक्के महसूल संकलित केला असून रुपये ५०,५०० कोटी रुपयांची विक्रमी वसुली करण्यात आली. मार्चअखेर २८ लाख २६ हजार १४१ इतक्या दस्तांची नोंदणी पूर्ण केली असून सन २०२३-२४ मध्ये वार्षिक बाजारमूल्य दरतक्त्यात कोणतीही दरवाढ न करता महसूल वसुलीचे उद्दिष्ट विभागाने पूर्ण केले असल्याची माहिती राज्याचे नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक हिरालाल सोनवणे यांनी दिली.

मुद्रांक विभागाकडे सन १९८० पासूनची मुद्रांक शुल्काच्या थकीत वसुलीच्या प्रलंबित प्रकरणी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४६ मधील तरतुदीनुसार सक्तीच्या मार्गाने वसुली करण्यासाठी थकबाकीदारांना नोटीस देण्यात आली. बाजारमूल्य दरतक्त्यानुसार मुद्रांक शुल्काची वसुली तसेच अंतर्गत तपासणी, तात्काळ दस्त तपासणी महालेखापाल तपासणीमधील मुद्रांक शुल्काच्या वसुलीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये वसुलीसाठी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी थकबाकीदारांच्या घरी सुट्टीच्या दिवशी भेटी देऊन वसुलीसाठी पाठपुरावा करुन ही वसुली करण्यात आली.

मुद्रांक शुल्काच्या थकबाकीची काही प्रकरणे उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत, अशा प्रकरणी स्थगिती उठविणे, तसेच प्रकरणे निर्गत करण्यासाठी सहायक सरकारी वकील यांच्याकडे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी पाठपुरावा करुन प्रकरणे प्राधान्याने निर्गत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे अभिनिर्णयासाठी दाखल झालेली प्रकरणे प्राधान्याने निर्गत करुन त्याद्वारे मुद्रांक शुल्काची रक्कम मोठ्या प्रमाणात वसूल करण्यात आली.




### अभय योजनेची प्रभावी अंमलबजावणी

शासनाने सन १९८० ते २०२० या कालावधीत निष्पादित करण्यात आलेल्या नोंदणीकृत तसेच अनोंदणीकृत दस्तांसाठी मुद्रांक शुल्क व दंडामध्ये सवलत, माफी देण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ लागू करण्यात आली आहे. त्यानुसार अभय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील अधिकारी यांची प्रत्येक विभागासाठी समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. समन्वय अधिकारी यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी तसेच दुय्यम निबंधक कार्यालयांना भेटी देवून अभय योजनेमध्ये वसुलीवरील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून अभय योजनेचा साप्ताहिक आढावा घेण्यासाठी सर्व अधिकारी यांच्या दर आठवड्याला, पंधरावड्याला ऑनलाईन पद्धतीने बैठका घेऊन प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

नोंदणी महानिरिक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्याकडे मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार दाखल असलेली अपिल व पुनरिक्षण प्रकरणे निर्गत करण्यासाठी विशेष मोहीमेद्वारे मुंबई शहर व उपनगर येथील प्रकरणांची संख्या जादा असल्याने लोकांच्या सोयीसाठी या प्रकरणांची सुनावणी मुंबई येथे घेण्यात येत आहे. सन २०२३-२४ या वर्षात ४६१ अपिल,रिव्हीजन प्रकरणे निर्गत करण्यात आली. त्याद्वारे थकीत मुद्रांक शुल्काची मोठ्या प्रमाणात वसुली झाली.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १० ड (१) अन्वये शासनाच्या ३ जून २०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार राज्य शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय निमशासकीय संस्था इत्यादी कार्यालयांना त्यांच्या यंत्रणामार्फत करण्यात येणाऱ्या कार्यकंत्राट, विकसन करार, टी डी आर हस्तांतरण, भाडेपट्टा इत्यादी दस्तावरील मुद्रांक शुल्क जीआरएएस (GRAS) प्रणालीवर भरून त्याबाबत दरमहा मासिक अहवाल मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्याबाबत ७ जुलै २०२३ रोजीच्या परिपत्रकाद्वारे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या कामी समुचित प्राधिकारी व नोडल अधिकारी नियुक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे स्तरावरून संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

नागरिकांच्या सोयीच्यादृष्टिने दस्त नोंदणी करण्यासाठी मार्च २०२४ अखेर येणाऱ्या २३,२४ तसेच २९,३० व ३१ मार्च या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालय तसेच सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांची कार्यालये, नोंदणी उपमहानिरिक्षक तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांची कार्यालये सुट्ट्यांच्या दिवशी सुरु ठेऊन दस्त नोंदणी करण्यात आली.

# हेल्मेटसक्ती करण्यास सुरुवात

## हेल्मेट न घालणाऱ्यांवर कारवाईचा बडगा : तीन महिन्यांत साडेबारा हजार चालकांना दंड

**पिंपरी | प्रतिनिधी**

दुचाकींचे शहर म्हणून पुण्यापाठोपाठ पिंपरी-चिंचवडकडे पाहिले जाते. त्यामुळे दुचाकी चालकांवर कारवाईचा बडगा सातत्याने उगारला जात असून, हेल्मेट न घालणाऱ्या तब्बल साडेबारा हजार दुचाकीस्वारांना मागील तीन महिन्यांत पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ६२ लाख १८ हजार ५०० इतका दंड केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मागील काही वर्षांपासून प्राणांतिक अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये दुचाकीस्वारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे वाहतूक विभागाने दुचाकीस्वारांना हेल्मेटसक्ती करण्यास सुरुवात केली आहे. वारंवार आवाहन करूनही प्रतिसाद न देणाऱ्या दुचाकीस्वारांवर आता थेट कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. मागील तीन महिन्यात पोलिसांनी १२ हजार ४६१ चालकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. दंड करण्यात आलेली रक्कम ६२ लाख १८ हजार ५०० इतकी आहे.

मागील वर्षी शहर परिसरात एक हजारपेक्षा जास्त अपघात झाले आहेत. यामध्ये १९१ प्राणांतिक अपघात झाल्याची नोंद आहे. यातील महत्त्वाची बाब म्हणजे सकाळी आठ ते दुपारी बारा यावेळेत सर्वाधिक अपघात झाले आहेत. त्यामुळे सकाळी वाहन चालवताना घाई गडबड करू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



### ओव्हर स्पीड, डेंजर ड्राइव्ह बेततेय जीवावर

मागील वर्षी झालेल्या अपघातांमध्ये दुचाकीस्वार तरुणांना आपला जीव गमवावा लागला आहे. बहुतांश तरुण भरधाव वेगात, धोकादायक पद्धतीने दुचाकी चालवत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी आता ओवर स्पीड आणि डेंजर ड्राईव्ह करणाऱ्या चालकांना रडारवर घेतले आहे. मागील तीन महिन्यात ओवर स्पीड प्रकरणी चार हजार ४४४ जणांवर तर डेंजर ड्राइव्ह प्रकरणी ४३ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

### वर्षभरात ३८५ जणांचा अपघाती मृत्यू

पिंपरी- चिंचवड शहर परिसरात मागील वर्षी ३८५ तर सन २०२२ मध्ये ३७४ जणांचा अपघाती मृत्यू झाल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे. यामध्ये दुचाकीवर जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून वाहनचालकांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरू आहे. यासोबतच दंडात्मक कारवाई देखील करण्यात येत आहे.

> शहर परिसरात होणाऱ्या अपघातात अनेकांना हेल्मेट नसल्यामुळे जीव गमवावा लागलेला आहे. हेल्मेटचा वापर केला असता, तर कदाचित त्यांचा जीव वाचला असता. त्यामुळे हेल्मेट वापरण्याकडे 'सक्ती' म्हणून न पाहता एक गरज म्हणून पहावे. हेल्मेट न वापरता दुचाकी चालवणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहणार आहे.
>
> **- विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग.**

# मोहोळ यांच्या प्रचारासाठी खास रणनिती

## भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात भाजपकडून घर चलो अभियान

**पुणे | प्रतिनिधी**

देशभरात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. प्रचार यंत्रणा जोरात कामाला लागल्या आहेत. पुण्यातही प्रचार शिगेला पोहोचला आहे. अशात घराघरात प्रचार करण्यासाठी भाजपने विशेष रणनिती आखली आहे. भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात भाजपकडून ‘घर चलो अभियान’ राबवण्यात येणार आहे. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी भाजप पुणे शहरात 3 लाख घरांमध्ये वाटणार एक विशेष पत्रकं वाटली जाणार आहेत. 6 एप्रिलला भाजपचा वर्धापन दिन आहे. या दिवशी प्रत्येक घरात भाजप वाटणार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचाराचं पत्रक वाटणार आहे.



पुण्यात लोकसभा निवडणुकीसाठी तीन उमेदवार रिंगणात उतरले आहे. त्यात महायुतीकडून मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकरांना उमेदवारी देण्यात आली आहे तर वंचितकडून वसंत मोरेंना उमेदवारी देण्यात आली आहे. तिन्ही उमेदवार तगडे असल्याने तिन्ही पक्षाकडून प्रचाराची जोरदार तयारी सुरु आहे. प्रचारासाठी नवनव्या रणनिती आखल्या जात आहे. त्यातच भाजपकडून आता मुरलीधर मोहोळांच्या प्रचारासाठी नवी रणनिती आखण्यात आली आहे. भाजपकडून रात्रंदिवस एक करत मुरलीधर मोहोळांना विजयी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

### पुणेकर भाजपला मतदान करणार- धीरज घाटे

भाजपचे पुणे शहरात मतदान वर्षानुवर्ष पुणेकर भाजपला मतदान करतात. आमच्याकडे अजितदादांसारखं तगड नेतृत्व आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे इतकं चांगलं काम करत आहेत. आरपीआयची ताकद आमच्यासोबत त्यामुळे हे सगळे एकत्रित मिळून मुरलीधर मोहोळ यांना खासदार करतील. मुरलीधर मोहोळ यांना मोठे मताधिक्य राहील. 20 ,21 एप्रिल नंतर पुणे लोकसभेचा फॉर्म भरला जाईल. महायुतीचे सर्व नेते मोहोळ यांचा फॉर्म भरायला उपस्थित राहतील, असंही धीरज घाटे म्हणाले.

देशात एकच पॅटर्न सुरू आहे, तो म्हणजे मोदी पॅटर्न... मोदी पॅटर्न समोर बाकीचे सगळे पॅटर्न फिके आहेत. पुण्यात केवळ मोदीजींचाच पॅटर्न चालेल. देशातल्या जनतेला मोदीजींमध्ये आश्वासक चेहरा दिसतो. म्हणून मोदी पुन्हा निवडून येतील आणि पंतप्रधान होतील, असा विश्वास धीरज घाटे यांनी व्यक्त केला.

या माध्यमातून भाजपचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचणार आहेत. प्रत्येक पुणेकरांना भाजपला मतदान करण्याचं आवाहन करण्यात येणार आहे. पुण्यात 10 ते 12 लाख नागरीकांना हे पत्रक वाटप करण्यात येणार आहे.

पुण्यात मोहोळ यांच्या प्रचारासाठी भाजप शहरात 3 लाख घरांमध्ये एक विशेष पत्रक वाटले जाणार आहे.

### अभियानाला कोण-कोण हजेरी लावणार?

» निभाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री चंद्रकांत पाटील देखील या ‘घर चलो अभियान’ अभियानात सहभागी होणार आहेत. पुण्यातील महायुतीचे सर्व स्थानिक आमदारदेखील घरोघरी जात पत्रकं वाटणार आहेत. 10 ते 12 लाख नागिरकांना भाजप पत्रक देणार आहे. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी भाजपने नवी रणनीती आखली आहे. पुणे भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी या अभियानाबाबत माहिती दिली आहे. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी आम्ही ‘घर चलो अभियान’ आम्ही राबवत आहोत. 6 एप्रिलला प्रत्येक घरात आम्ही पत्रकं वाटणार आहोत, असं धीरज घाटे म्हणाले.

# केबलमधील बिघाडाने मेट्रो सेवा विस्कळित

## शिवाजीनगरचा एकच प्लॅटफॉर्म सुरु असल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या लाईनच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला आहे. त्यानंतर आता पुण्यातील चक्क मेट्रो बंद पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुस्साट सुटलेल्या पुणे मेट्रोला अचानक ब्रेक लागला.

रेंजहिल ते शिवाजीनगर दरम्यान मेट्रोच्या भुयारी मार्गातील ओव्हरहेड केबलमध्ये (ओएचई) बिघाड झाल्यामुळे मेट्रो बंद पडली. त्यामुळे दुपारी तासभर मेट्रो सेवेवर परिणाम झाला. या काळात मेट्रो सेवा एकाच मार्गावर घेतल्यामुळे अनेक मेट्रोंचे डायव्हर्जन करण्यात आले. शिवाजीनगरचा एकच प्लॅटफॉर्म सुरू असल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला होता.

शिवाजीनगर मेट्रो स्टेशन येथे पुण्याकडून पिंपरीकडे जाणारा एकच प्लॅटफॉर्म सुरू ठेवण्यात आला होता. हा बिघाड व्यवस्थित करण्यासाठी ४० मिनिटे लागली. या काळात एकाच मार्गावरून गाड्या चालविण्यात आल्या. त्यामुळे काही गाड्यांचे मार्ग वळवावे लागले. परिणामी एक तासभर मेट्रो सेवा विस्कळित झाली होती.

पुणे मेट्रोने बुधवारी दुपारी पिंपरी-चिंचवड ते दिवाणी न्यायालय मार्गावरील खडकी-शिवाजी नगर विभागातील सेवा विस्कळीत झाल्याची चौकशी सुरू केली आहे.

पुणे मेट्रो चालवणाऱ्या महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले की, रेंजहिल्सजवळील ओव्हरहेड पॉवर केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने सेवा विस्कळीत झाली. “अशा घटना खरं तर फार दुर्मिळ आहेत. ओव्हरहेड केबल तुटण्याची ही पहिलीच घटना आहे. मेट्रो ट्रेन अडकल्यानंतर, प्रवाशांची काळजी घेण्यासाठी आम्ही लगेच दुसरी ट्रेन पाठवली,” हर्डीकर म्हणाले.



पुणे मेट्रो चालवणाऱ्या महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले की, रेंजहिल्सजवळील ओव्हरहेड पॉवर केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने सेवा विस्कळीत झाली.एका मार्गावरील मेट्रो सेवा ठप्प झाल्याने प्रवाशांनी सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली. महा मेट्रो सुरू होऊन महिना उलटूनही सेवा सुरळीतपणे चालवू शकली नसल्याचा आरोप काहींनी केला.

एका मार्गावरील मेट्रोची वाहतूक प्रभावित झाली असली तरी दुसऱ्या मार्गावरील वाहतूक सुरूच होती. ” 15 मिनिटे रेल्वे सेवा प्रभावित झाली. केबल पुनर्संचयित करण्यासाठी 40 मिनिटे लागली, त्यानंतर सर्व काही सामान्य झाले. मेट्रो अचानक बंद पडल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला.

### ओएचईमध्ये बिघाड...

शिवाजीनगर ते रेंजहिल दरम्यान ओएचईमध्ये बिघाड झाल्यामुळे दुपारी दोन वाजून ४० मिनिटांनी सेवा अचानक बंद झाली. त्यामुळे प्रवाशांना काय झाले, हे समजले नाही. शेवटी प्रवाशांना दुसऱ्या मेट्रोमध्ये बसविण्यात आले. ओएचईमध्ये बिघाड झाल्यामुळे शिवाजीनगर ते रेंजहिल दरम्यान एकाच मार्गावर मेट्रो सेवा सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे काही गाड्यांना उशीर झाला. यापूर्वी वीज गायब झाल्यामुळे मेट्रो बंद पडल्याच्या घटना घडल्या आहेत. आता भुयारी मार्गातील एक लाइनच्या ओएचईमध्ये बिघाड झाल्याचा फटका प्रवाशांना बसला. मेट्रो अचानक बंद पडल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला